तात्काळ/महत्वाचे
कालमर्यादा

SHRI BALASAHEB GAWARE SHIKSHAN PRASARAK MANDAL
SECRETARY

जा.क्र.शिउसं/माध्य/३०३/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१७
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय /६७
दिनांक:- 22 NOV 2017

प्रति,
अध्यक्ष/सचिव,
श्री बाळासाहेब गवारे शिक्षण प्रसारक मंडळ, शिघोजे बिजलीनगर चिंचवड, पुणे

विषय - सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याबाबत....

संदर्भ :- १. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.
२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र माहअ-२००९/(६६३/०९)/माशि-१ दिनांक २० जुन २०१२.
३. शासन निर्णय एसएफएस-२०१६/प्र.क्र.१०८/एसएम-२ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई-३ दि. ०२/०९/२०१६.
४. मा. शिक्षण संचालनालयाकडील पत्र क्र. अमाशा/स्वयंअर्थ/२०१६/१६-१७/३०१ दि. २६/०९/२०१६.

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की,आपल्या संस्थेने वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता प्रस्ताव सादर केला होता.त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक-०३ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| शासन यादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | पुणे | श्री बाळासाहेब गवारे शिक्षण प्रसारक मंडळ, शिघोजे बिजलीनगर चिंचवड, पुणे | गवारे एज्युकेशनल इंग्लिश स्कूल, निघोजे, ता. खेड जि. पुणे | इंग्रजी | नवीन शाळा (राज्य मंडळ) | प्राथमिक (इयत्ता १ ली ते ५ वी) | २०१६-१७ |

अटी व शर्ती :-

१. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादींमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.
२. शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे,त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआप रद्द** समजण्यात येईल.
३. या अधिनियमातील तरतुदींनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी **शैक्षणिक वर्ष २०१६-१७** पासून असेल.
४. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गा व्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत.
५. परवानगी मिळालेपासून १८ (अठरा) **महिन्यांच्या** आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी आपोआप **रद्दबातल** ठरेल.
६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/दर्जावाढ शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील.
७. शाळा इमारतीच्या दर्शनीभागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयं **अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा** असे दर्शविणारा फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे बंधनकारक राहील.
८. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळेचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
९. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी प्राप्त शाळांना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन व्यवस्थापनाने शाळा मान्यतेकरिता माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ०३ परिशिष्ठ ०२ मधील विहित नमुन्यात **एक महिन्याच्या आत** प्रथम मान्यतेचा प्रस्ताव सक्षम अधिका-यांकडे सादर करणे आवश्यक राहील.
१०. **सीबीएसई,आयसीएसई,आयबी,आयजीएसई,आणि सीभायई** इत्यादी शिक्षण मंडाळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास /शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून **परवानगी** (Permission) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दिनांक २० जून २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार **ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C )** मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस मान्यता घेणे आवश्यक राहील.शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या **संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C. )** मिळविणेसाठी शासनास अर्ज करेल.
११. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना U-DISE (Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरतांना '***स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा***' म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करणे आवश्यक राहील.

Scanned by Scanner Go